## L. A. BILL No. II OF 2023.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २.

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९५९ चा ३. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १६३ मध्ये, पोट-कलम (१) मधील,— १९५९ चा ३.

(अ) खंड (१) मधील, " पराकाष्ठा एक महिना मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा तीनशे रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील " या मजकुराऐवजी, " एक हजार पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) खंड (२) मधील, " पराकाष्ठा सहा महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा पाचशे रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २.]**

**[महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. गिरीश महाजन,**
ग्रामविकास मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई